## आदेश

आरोपी न्यायलयात हजर झाल्यानंतर त्याला त्याच्यावरील आरोप त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगण्यात आले. आरोपीने त्याच्यावरील आरोप स्वेच्छेने व कोणताही दबाव नसताना स्वीकारल्याची कबुली दिली. त्याने गुन्हा कबुल करीत असताना त्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेउन त्याचबरोबर त्याचा पहिला गुन्हा असल्याचे कथन करुन दया दाखविण्याची विनंती केली. आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबूल केला असून प्रकरणातील तथ्य व आरोपीचे कथन लक्षात घेउन मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहीता कलम २५२ अन्वये मो.वा. कायद्याचे कलम १८४ अंतर्गत दोषी ठऱवून रक्कम रुपये ५००/– (पाचशे रुपये) द्रव्य दंडाची शिक्षा ठोठावण्यात येत व दंड भरण्यास कसूर केल्यास १० दिवसाची साधी कैदेची शिक्षा ठोठावण्यात येते.

२. आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहीता कलम २५२ अन्वये मो.वा. कायद्याचे कलम १८५ अंतर्गत दोषी ठरवून रक्कम रुपये १०००/– (एक हजार रुपये) द्रव्य दंडाची शिक्षा ठोठावण्यात येते व दंड भरण्यास कसूर केल्यास २० दिवसाची साधी कैदची शिक्षा ठोठावण्यात येते.

३ सदरची माहिती परवाना जारी करणा–या प्रादेशिक परिवहन कार्यालयाला पाठवावी.

४. आदेशाची प्रत आरोपीस विनामुल्य तात्काळ देण्यात यावी.

( ए. डब्लु. क्षिरसागर )
प्रभारी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
मो. वा. न्यायालय, नागपूर.

दिनांक ०२–०१–२०१९